# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ११८ वा ❑ भारतीय सौर दिनांक २८ ज्येष्ठ शके १९४८, गुरूवार दि.१८ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### स्मार्ट मीटर सक्ती की ग्राहकांची लूट? वीजबिलांमधील वाढीव दरांमुळे नागरिक त्रस्त

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

स्मार्ट मीटर सक्ती आणि अवास्तव वाढीव वीजबिलांच्या मुद्द्यावरून राज्यभरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप असून, महावितरणच्या कारभारावर डिजिटल लुटीचे आरोप होत आहेत. महावितरणने थेट मोबाईलवर पाठवलेल्या '४८ तासांत मीटर बदलून स्मार्ट मीटर बसवण्यात येईल' या संदेशामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.महाराष्ट्रात (विशेषतः महावितरण/ अंतर्गत) स्मार्ट मीटर सक्ती आणि वाढत्या वीजबिलांमुळे ग्राहकांमध्ये मोठा संताप पसरला आहे. अचानक येणाऱ्या अवास्तव बिलांमुळे नागरिक त्रस्त असून, याला ग्राहकांची लूट म्हटले जात आहे.

जुने मीटर बदलून स्मार्ट मीटर लावल्यानंतर वीज बिलात अचानक मोठी वाढ झाल्याच्या (तिप्पट किंवा चौपट) तक्रारी अनेक भागांतून येत आहेत. स्मार्ट मीटरमुळे भविष्यात प्रीपेड प्रणाली (रिचार्ज संपल्यास वीज बंद होणे) लागू होण्याची आणि वीज दरांमध्ये वाढ होण्याची ग्राहकांना भीती वाटते.

महावितरणच्या वतीने जुने मीटर बदलून स्मार्ट मीटर बसवण्याच्या मोहिमेला महाराष्ट्रात नागरिकांचा, ग्राहक संघटनांचा आणि स्थानिक राजकीय पक्षांचा तीव्र विरोध होत आहे नागरिकांची पूर्वसंमती न घेता सक्तीने मीटर बदलणे, वाढीव वीज बिलाची भीती आणि पारदर्शकतेचा अभाव यामुळे हा असंतोष निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे महावितरणकडून ग्राहकांना थेट मेसेज पाठवून ४८ तासांत मीटर बदलण्याची सक्ती केली जात आहे. ग्राहकांच्या मते, कोणते मीटर बसवायचे हा त्यांचा मूलभूत अधिकार असून संमतीशिवाय सक्ती करता येणार नाही.स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वीज बिल जास्त येत असल्याच्या तक्रारी इतर राज्यांतून आल्यामुळे, नागरिक आणि हाउसिंग सोसायट्या चिंतेत आहेत. अनेक ग्राहकांनी अलीकडेच स्वतःच्या खर्चाने नवीन मीटर बसवले आहेत, ते निकामी नसताना पुन्हा नवीन स्मार्ट मीटर बसवण्याचा अवाजवी खर्च ग्राहकांवर का लादला जात आहे, असा सवाल नागरिकांनी विचारला आहे.

वाढत्या विरोधामुळे आणि अनेक हाऊसिंग सोसायट्यांनी मीटर बदलणाऱ्या कर्मचाऱ्यांना रोखल्यामुळे महावितरण प्रशासनाची मोठी कोंडी झाली आहे.कल्याण, डोंबिवली आणि पुणे यांसारख्या शहरांत नागरिकांनी थेट रस्त्यावर उतरून निदर्शने केली आहेत.

नागरिकांचे म्हणणे आहे की, स्मार्ट मीटरची अंमलबजावणी करण्यापूर्वी अखंड आणि दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध करणे आवश्यक आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असताना स्मार्ट मीटर लावण्याऐवजी खंडित वीजपुरवठ्यामुळे होणाऱ्या गैरसोयीबाबत नुकसानभरपाईची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी काही ग्राहकांनी केली आहे. टिटवाळा परिसरात वारंवार होणाऱ्या वीजखंडितीच्या विरोधात तसेच स्मार्ट मीटरविरोधात शेकडो नागरिकांनी आंदोलन केल्याची माहिती समोर आली आहे. यावेळी स्मार्ट मीटर योजनेला विरोध कायम ठेवण्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली.

मागील काही दिवसांपासून महावितरणकडून स्मार्ट मीटरच्या वापराबाबत जनजागृती केली जात आहे. मात्र, स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वीजबिलात वाढ झाल्याचा दावा काही ग्राहकांनी केला असून यासंदर्भात त्यांनी महावितरण कार्यालयात जाऊन तक्रारी नोंदवल्या आहेत. तक्रारींचे समाधानकारक निराकरण होत नसल्याची भावना काही ग्राहकांनी व्यक्त केली आहे.

राज्यात स्मार्ट मीटरच्या अंमलबजावणीवरून वाद अधिक तीव्र होत असतानाच मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभेतील एका जुन्या भाषणाची क्लिप सोशल मीडियावर पुन्हा व्हायरल झाली आहे. त्यात सामान्य घरगुती ग्राहकांवर स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती केली जाणार नाही, असे फडणवीस सांगताना दिसत आहेत. दुसरीकडे महावितरणकडून स्मार्ट मीटर बदलासाठी पाठविण्यात येणाऱ्या ४८ तासानंतरच्या नोटिसांविरोधात ग्राहकांकडून लेखी व कायदेशीर नकार अर्ज मोठ्या प्रमाणात प्रसारित केला जात आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरचा मुद्दा पुन्हा राज्यभर चर्चेचा विषय ठरला आहे.

सोशल मीडियावर फिरत असलेल्या व्हिडिओमध्ये देवेंद्र फडणवीस विधानसभेत स्मार्ट मीटर धोरणाबाबत बोलताना दिसतात. सामान्य ग्राहकांवर स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती होणार नसल्याचा उल्लेख या भाषणात असल्याचा दावा व्हिडिओ शेअर करणाऱ्यांकडून केला जात आहे. त्यामुळे सध्याच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

स्मार्ट मीटरमुळे बिल वाढेल का, प्रीपेड प्रणाली लागू होईल का, रिचार्ज संपल्यास वीजपुरवठा खंडित होईल का, अशा प्रश्नांमुळे ग्राहकांमध्ये संभ्रम आहे. काही ठिकाणी नागरिकांनी मीटर बदलास विरोध दर्शविल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.

महावितरण आणि राज्य सरकारचे म्हणणे आहे की स्मार्ट मीटरमुळे अचूक बिलिंग, वीज चोरीवर नियंत्रण, रिअल टाइम वीज वापराची माहिती आणि तांत्रिक सुधारणा साध्य होतील. ही योजना वीज वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असल्याचा दावा केला जातो.

जरी लोकांचा विरोध होत असला तरी दबाव टाकून स्मार्ट मीटर बसविण्याचा सरकारचा निर्णय असल्याचे समजते. त्यामुळे जनतेत असंतोष वाढत चालला आहे. महावितरण प्रशासन आणि सरकार हा वाढता विरोध कसा हाताळणार, याकडे आता सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# कुंभमेळा हा सामाजिक एकत्वाचे माध्यम: सहसरकार्यवाह अतुल लिमये

## प्रशासकीय अधिकाऱ्यांसह विविध सामाजिक-सांस्कृतिक संघटनांचा सहभाग

**ज्योतिर्मय साहित्य**

नाशिक – ''कुंभमेळा हा केवळ पर्वणी आणि स्नानापुरता मर्यादित नसून, त्याला व्यापक धार्मिक व सामाजिक भावजागरणाचे अंग आहे. काळानुरूप परिवर्तन आणि सामाजिक एकत्वाची भावना या पर्वणीतून अधिक दृढ होते. त्यामुळे केवळ प्रशासकीय पातळीवर नव्हे, तर समाजाच्या सक्रिय सहभागातून आगामी कुंभमेळा अधिक प्रभावी आणि यशस्वी करूयात,'' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह अतुल लिमये यांनी येथे केले.



आगामी कुंभमेळा अधिकाधिक पर्यावरणपूरक, भाविकांसाठी सुलभ आणि स्थानिक रोजगाराला चालना देणारा ठरावा, या उद्देशाने नाशिक येथील भोसला मिलिटरी कॉलेजमध्ये एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. कुंभमेळ्यातील जनसहभाग या मुख्य विषयावर या बैठकीत विस्तृत चर्चा झाली. या कुंभपर्वामध्ये धार्मिक आयोजनांबरोबरच सामाजिक, आरोग्य, आर्थिक, शैक्षणिक, कला, विज्ञान, सांस्कृतिक आणि जनजाती कल्याण अशा विविध क्षेत्रांतील उपक्रमांच्या नियोजनाबाबत या वेळी मंथन करण्यात आले.

प्रयागराज येथील कुंभमेळ्यात विविध प्रकारचे यशस्वी कार्यक्रम राबविणाऱ्या प्रमुख संस्था आणि संघटनांचे वरिष्ठ पदाधिकारी या बैठकीला प्रामुख्याने उपस्थित होते. बैठकीत लिमये यांच्यासह विश्व हिंदू परिषदेचे महामंत्री मिलिंद परांडे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र कार्यवाह बाळासाहेब चौधरी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

बैठकीत जनजाती कल्याण आश्रम, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), सक्षम, शिक्षा संस्कृती उत्थान न्यास, संस्कृत भारती, क्रीडा भारती, संस्कार भारती, धर्म संस्कृती संगम, भारत तिब्बत सहयोग मंच आणि भटके विमुक्त प्रतिष्ठान यांसारख्या विविध सामाजिक व सांस्कृतिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आगामी कुंभमेळा स्थानिकांच्या सक्रिय सहकार्याने कसा यशस्वी करता येईल, यावर या सर्व संघटनांच्या वतीने विविध विधायक मुद्दे मांडण्यात आले.

कुंभमेळ्याच्या नियोजनात प्रशासकीय पातळीवर उत्तम समन्वय साधण्यासाठी विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आणि महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, कुंभ समन्वयक रामेश्वर नाईक उपस्थित होते. तर, कुंभमेळ्यादरम्यान कायदा व सुव्यवस्था चोख राखण्याच्या दृष्टीने पोलीस महानिरीक्षक संजय एनपुरे, नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी आणि नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्यासह इतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही या बैठकीला उपस्थित राहून प्रशासकीय तयारीचा आढावा घेतला.

# शाळा निवडीचा निर्णय कुणाचा? पालकांचा कि पाल्यांचा?

**ज्योतिर्मय साहित्य**

सुट्ट्या संपल्या. आणि शाळा उघडल्या. शाळेची लगबग सुरु झाली. जिकडे पहावे तिकडे ऍडमिशन आणि वह्या, पुस्तकांच्या खरेदीची घाईगर्दी. सरिता काकुंची पहाटे पासूनची घाई. स्वयंपाक, मुलांच्या अंघोळी, त्यांचा नाश्ता, शाळेचा डबा, घराची आवराआवर सगळं कांही घाईघाईत होत होतं. सातव्या वर्गातील मोठा मुलगा जय तरी विचारलंच आईला. ''ऐ आई अगं काय हे किती ही घाई तुझी. कुठे जायचंय आपल्याला?''. ''अरे ! कुठे जायचंय काय विचारतोयंस?. अरे, आज पियूला शाळेत टाकायचंय ना. विसरलास कि काय? चल चल आवर पटकन. हे घे टाय, ही तुझी घडी आणि हा डबा. जय बाळा अरे काय हे. कसं भांग काढलंस. अरे निट विंचरायचं ना. तुझी इंग्रजी शाळा किती कडक आहे माहितीये ना. मग अपटूडेट राहायचं बाळा. चल झालं का. पियू चल बाळा''.



धाडस करून जय ने आईला विचारलंच. ''आई, पियुला कोणत्या शाळेत टाकायचंय कांही ठरवलयंस का''?. ''अरे, आता त्यात ठरवायचं काय?. माझा आणि बाबांचा एकच निर्णय. पण असं का विचारतोयंस?. कोणत्या शाळेत म्हणजे अर्थात इंग्लिश मिडीयम''. ''आई थांब ना थोडं. मला बोलायचंय तुझ्याशी. आई तु आणि बाबा मला न विचारता इंग्लिश स्कूल मध्ये माझं ऍडमिशन केलं. पण पियुच्या बाबतीत तसं नका करू. आई अगं पियुला शाळेबद्दल अजून कांहीच कळत नाही. मराठी शाळा कि इंग्रजी शाळा. ती काय बॅग पाठीवर अडकवून हातात एक लॉलीपॉप घेऊन जाईल शाळेला.

पण आई एकदा तिलाही ठरवूदेत तिला कोणत्या शाळेत जायचंय ते?. आई, तु एक काम कर. हे बघ पियुला इंग्लिश स्कूल समोर थोडा वेळ थांबवून बघ आणि नंतर मराठी शाळेसमोर. ज्या शाळेसमोर थांबुन पियू हसेल, तिच्या चेहऱ्यावर आनंदाचं हसु येईल आपण तिला त्याच शाळेत टाकूया. प्लीज आई''.

सरिता काकु मात्र जयच्या बोलण्याने स्तब्ध, शांत झाल्या. जयच्या सांगण्याप्रमाणे सरिता काकुंनी तशीच कृती केली. पियुला इंग्लिश स्कूल समोर थोडा वेळ उभं केलं पण पियुच्या चेहऱ्यावर कसलाच आनंदी भाव दिसला नाही. आणि मराठी शाळेसमोर थोडा वेळ उभं केलं असता पियू स्वतः हुन शाळेच्या मैदानाकडे पळू लागली. सरिता काकु पुरत्याच सुखावल्या. आणि कसलाच विचार न करता पियुचं मराठी शाळेत ऍडमिशन केलं. पियू रोज हसत खेळत शाळेला जाऊ लागली. शाळेतून घरी आल्यावर

''येरे येरे पावसा तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा पाऊस आला मोठा''

''आई मला पावसात खेळायला जाऊदे ना''

''येगं येगं सरी तुझे मडके भरी
सर आली धावून मडके गेले वाहून''

''असावा सुंदर चॉकलेटचा बंगला''

''लिंबू टिंबू पैशा पैशाला
शाळेतल्या मुली आल्या खेळायला. खेळून खेळून खोकला आला खो. खो. खो''

''टप टप चाले टांगेवाला''

ही सगळी गाणी गोड आवाजात आईबाबांना म्हणून दाखवायची. शाळेतल्या गंमती जमती सांगायची. ''ऐ आई माझी शाळा खुप छान आहे. आमच्या मॅडम आमच्या जवळ बसून आम्हाला अ, आ, इ, ई,. क, ख, ग, घ. सगळं खुप छान शिकवतात''. मुलीचं शाळेबाबतितलं समाधान पाहून कुठेतरी सरिता काकूंना मनोमनी वाटलं कि



सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे
देगलूर. जि. नांदेड
मो. 9960028899


शाळा निवडीच्या बाबतीत योग्य निर्णय घेतला म्हणून.


मराठी शाळा, इंग्रजी शाळा म्हणत म्हणत शिक्षणाचा बाजार मांडला गेलाय. सध्या इंग्रजी शाळेची क्रेज आहे. हे तर सर्वश्रुत आहेच. खेड्यापाड्यापासून शहरा पर्यंतच्या सगळ्या मराठी शाळा लोप पावत चालल्या आहेत. अगदी बोटांवर मोजण्या इतक्या मराठी शाळा कुठेतरी दिसतायंत. शाळा निवडीच्या बाबतीत मुलांचा निर्णय आज घडीला खुप महत्वाचा आहे. कारण मुलांना शिकायचे आहे, अभ्यास मुलांना करावयाचा आहे, अभ्यासात येणाऱ्या सोप्या, अवघड गोष्टींना, अडचणींना मुलांनाच सामोरे जावे लागते.

कारण, प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतः ची बौद्धिक क्षमता, बौद्धिक पातळी चांगली ठाऊक असते. आपल्याला कोणता विषय सोपा जातो कोणता विषय खुप अवघड जातो याचा पुरेपूर विचार करण्याची क्षमता आजच्या मुलांमध्ये आहे. हे पालक वर्गानी विसरता कामा नये. मराठी शाळा लोप पावत आहेत म्हणून पालकांनी आपल्या मुलांना मराठी शाळेत टाकावे असे नाही तर मुलांची इच्छा काय आहे त्यांना इंग्लिश मिडीयम कि मराठी मिडीयम शाळेत जायचे आहे ही बाब लक्षात घेता शाळा निवडीचा निर्णय सर्वस्वी मुलांवरच सोडून द्यावा.

त्यांची मुलं इंग्रजी शाळेत शिकत आहेत म्हणून आपणंही आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकायचे का? प्रत्येक पालकांनी हा साधा सरळ प्रश्न स्वतःलाच विचारावा. आपण पालक लोक मुलांच्या उज्वल भविष्याचा योग्यच विचार करतो. पण आपण आपल्या पाल्यांना दाखवत असलेली वाट खरंच पाल्यांसाठी सोपी आहे का? त्या वाटेवर चालण्याची त्यांची तयारी आहे का?. शिक्षण बाजूला सारून संभ्रमातील प्रश्नोत्तरांचाच खेळ खेळल्या जात आहे. म्हणून या सर्व गोष्टी दूर सारून पालकांनीच आपल्या पाल्यांना मग भलेही पाल्य नर्सरी वा बालवाडीतला का असेना. एकदा पाल्यांनाही विचारा कि तुला कोणत्या शाळेत शिकायचे आहे? मराठी शाळेत कि इंग्रजी शाळेत. पाल्यांना ज्या शाळेत शिकायचे आहे त्याच शाळेत पाल्यांना शिकूद्या. शाळा निवडीचा योग्य निर्णय पाल्यांवर सोडून द्या.

***





## जात्यावरच्या ओव्या......

आल भरून आभाळ
कोसळल वारेमाप
काठोकाठ ओसंडले
शेतबंधारे आपोआप ||६९८||

आल भरून आभाळ
दिसे कातळावाणी
असा जाय बरसून
सगळी कर आबादाणी || ६९९||


©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758


## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३९

ज्योतिर्मय साहित्य

एका शेतकऱ्याची गोष्ट फार सुंदर आहे. तो आपल्या शेताच्या बांधावर आरामात झोपला होता. त्याची एका मोक्याच्या ठिकाणी शेतजमीन होती. शहरातून आलेला एक कारखानदार ती जमीन विकत घेऊन तिथे कारखाना काढण्याच्या तयारीत होता. तो त्या शेतकऱ्याला म्हणाला ,''तू मला ही जमीन दिलीस तर मी तुला भरपूर पैसे देईन. तू श्रीमंत होशील.'' शेतकऱ्यांनी विचारले,''भरपूर पैसे मिळाल्यावर आणि श्रीमंत झाल्यावर काय होईल ?'' जमीनदार म्हणाला,''वेडा आहेस का ?अरे, तू अत्यंत समाधानात राहशील.'' शेतकरी म्हणायला,''मग त्यासाठी जमीन विकायची काय गरज आहे ? मी आत्ता देखील समाधानीच आहे.'' एका सामान्य शेतकऱ्याला जी गोष्ट कळली ती आपल्याला कळत नाही.

परमेश्वर प्राप्तीच्या आड जर काही येत असेल तर ते म्हणजे आपले मन ! आपले मन अतिशय चंचल आहे आणि ही गोष्ट सगळ्यांनाच माहिती आहे. म्हणून तर एका गाण्यात म्हटले आहे, '' माझिया मना जरा जरा थांब ना, तुझे धावणे अन् मला वेदना !'' म्हणून समर्थ म्हणतात की आपले हे चांचल्य म्हणजे चंचलता भगवंताला अर्पण करून आपली चित्त त्याच्याकडे केंद्रित करावे. त्याचे ध्यान लागावे.



गीतेत भगवंत म्हणतात ''सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज'' सर्वधर्म म्हणजे आपली सुखदुःखे, कर्म, वासना आदी सगळे भगवंताला अर्पण करून त्याला शरण जावे. तो आनंदनिधान आहे. अक्षय सुख आणि समाधान त्याच्याच ठायी आहे.

स्वसंवाद : १) मी ज्या सुखाच्या शोधात धावत आहे, ते खरोखरच मला समाधान देणारे आहे का? की ही केवळ अंतहीन धावपळ आहे?

२) माझ्या मनातील चंचलता, अपेक्षा आणि असंतोष मी कधी परमेश्वराला अर्पण करण्याचा प्रयत्न केला आहे का?

३) ''समाधान'' ही बाह्य गोष्टींमध्ये नसून अंतर्मनात आहे हे मला खरेच पटले आहे का?

(क्रमशः)




### चिकू बी अन् आंबा कोय

ह्या जगी मोहमायेत । कदापिही ना गुंतावे ।
सदा विरक्त राहावे । चिकू बी प्रमाणे ॥१॥
चिकू कापला असता । आतली बी हमखास ।
सोडून देते गरास । चिकटत नसे ॥२॥
आंबा कापला असता । त्याची कोय ती आतली ।
राहे गुरफटलेली । त्याच गरामध्ये ॥३॥
आंब्याची ती एक कोय । गुंते रसाच्या मोहात ।
सारे तिज पिळतात । जोरदारपणे ॥४॥
माधव हा म्हणे तशी । सोडा तुम्ही मोहमाया ।
झिजवा आपुली काया । ईश भक्तीसाठी ॥५॥


## ॥ संजय उवाच... ॥



@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ तोल
मानवी आयुष्यात मनाचा तोल खूप महत्वाचा आहे, प्रत्येक गोष्ट तोल सांभाळून यशस्वी करणे ही एक कसरतच असते त्यामुळे मनाचा तोल जो उत्तम सांभाळून कार्य करतो तोच खरा बुद्धिमान. म्हणून कधीही कोणत्याच बाबतीत तोल ढळू देऊ नये.

## नाम आणि प्रेम ही जुळी भावंडे आहेत.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

साधारण प्रापंचिकाची ओढ विषयाकडे असते. आज सुख कशात आहे एवढेच तो बघतो, आणि विषयात तो इतका तल्लीन होतो, की जगालाही तो तुच्छ मानतो. विषय शेवटी दु:खालाच कारणीभूत होतात हे तो विसरतो. विषय आणि मी एक होतो तेव्हा सुख होतेसे वाटते. पण वास्तविक, आजवर कुणालाही विषयाने शाश्वत सुख आणि समाधान मिळालेले नाही. असे सुख आणि समाधान मिळवण्यासाठी आपली वृत्ती भगवंताच्या ठिकाणी स्थिर ठेवणे हा एकच उपाय आहे. वृत्ती नेहमी एकाकार व्हावी, पण ती विषयात न होता नामात व्हावी, हेच सर्व संतांचे सांगणे आहे. ' मना ' ला उलटे केले की 'नाम' हा शब्द तयार होतो. याचा अर्थ असा की, नाम घेणे म्हणजे मनाची विषयाकडे असलेली ओढ उलटी फिरविणे. नाम म्हणजेच ' न मम '. प्रपंच माझा नाही म्हणून करणे म्हणजेच नाम घेणे. मी जितकी प्रपंचाची काळजी घेतो तितकी नामाची घेतो का, याचा प्रत्येकाने विचार करावा. प्रपंचातले आपले कर्तव्य अगदी मनापासून केल्यावर, जी परिस्थिती निर्माण होईल तिच्यामध्ये अत्यंत समाधानाने राहून नामस्मरणात काळ घालवावा.

निर्गुणाला एक जुळे झाले; ते म्हणजे नाम आणि प्रेम. दोन्ही एकमेकांना अतिशय चिकटून आहेत. एकाला धरले की दुसरे त्याच्या मागे येते. आज आपले प्रेम अनेक वस्तूंवर, व्यक्तींवर, पैशावर, विद्येवर, देहावर, लौकिकावर गुंतले आहे. त्या कारणाने, भगवंतावर प्रेम करून त्याच्यामागे नाम येईल अशी आपली अवस्था नाही. गोपींची तशी अवस्था होती. पण आपण नामाला वश करून घेऊ शकतो. ते झाले की भगवंताचे प्रेम आपोआप येईल. घरादारावर प्रेम सहवासाने बसते; मग नामाचा सहवास केला तर प्रेम का लागणार नाही ?

खरोखर, या जगात कुणाच्या बुद्धीला पचविता आल्या नाहीत अशा कितीतरी वस्तू आहेत. मुलाला आपल्या बापाचे बारसे पाहाणे जसे शक्य नाही, तसे ' मी कोण आहे ? ' हे बुद्धीने ओळखणे शक्य नाही. खरी सत्य वस्तू कल्पना, बुद्धी आणि तर्क यांच्या पलीकडे आहे. सत्याचा शोध करायचा असेल तर सत्य ज्याने झाकले आहे ती वस्तू दूर करा, म्हणजे सत्य दिसेल. सत्य हे आपल्याला उत्पन्न करता येत नाही; पण उपाधी मात्र उत्पन्न करता येते. उदाहरणार्थ, भीती, कल्पना इत्यादि आपणच उत्पन्न करतो. नदीच्या पुलावर उभे राहिले असता पायाला पाण्याचा स्पर्श न लागता देखील, वाहणाऱ्या पाण्याची मजा अनुभवता येते; त्याचप्रमाणे भगवंताचे सत्यत्व ज्याच्या अंत:करणाला पटले, तो विषयामध्ये राहून देखील, होणाऱ्या सुखदु:खाच्या गोष्टींकडे गंमत म्हणून बघेल आणि त्यापासून स्वत: अलिप्त राहील.

सुख हे विषयात नसून आत्म्यात आहे. आत्मा सुख-रूप आहे.

***

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर, पुणे

♦ अविद्या

पुढे
ज्ञान विज्ञान व अज्ञान याचा धावता आढावा घेतल्यानंतर आता या लेखाच्या मूळ विषयाकडे म्हणजे विद्या व अविद्या याकडे आपण आता वळू.

▪ विद्या : जो या परमात्म्यात सर्वांना, आणि सर्वांत परमात्म्याला पाहतो. त्याला सर्वां विषयी प्रेम वाटते.

भगवद्गीतेने ही विद्वान ब्राह्मणा पासून हत्ती, घोडा, कुत्रा, मांजर, चांडाळ या सर्वात ईश्वर पाहणाऱ्यालाच समदर्शी म्हटले आहे. त्यामुळेच एकत्वाचा अनुभव येतो. यामुळे शोक व मोह नष्ट होतात, आणि तो मनुष्य आनंदाने परिपूर्ण होतो. एकात्मतेचा रस्ता हा आनंदाचा असतो. अशी विद्या जी या एकात्मतेकडे नेते त्याविषयी ईशा वास्य उपनिषदात काय लिहिले आहे हेही पाहू.

अंध तम: प्रविशंति ये~विद्यामुपासते/
ततो भूत इव ते तयोय विद्यायां रता://

परमेश्वर प्राप्ती हेतूने केलेला शास्त्र अभ्यास व निष्काम कर्म म्हणजे विद्या. जे लोक अविद्येची उपासना करतात ,त्यांचा शेवटी अज्ञान स्वरूप घोर अंधकारात प्रवेश होतो. जे नुसत्या शास्त्राचे पठण करून मीथ्याभिमानाने मत्त होऊन "आमच्यासाठी काही कर्तव्य उरलेले नाही" अशा अविर्भावात कर्तव्य कर्म न करता शास्त्र विपरीत कर्मात रत होतात. तेही घोर नरकाला प्राप्त होतात.
क्रमश:.....




### "टाईम ईज अ मनी"

कोणतिही वेळ महत्वाची आहे व असते.वेळ व किंमत हे वेगळे. सुखदुःखाची सुध्दा एक वेळ असते. म्हणून स्वत:साठी वेळ काढा. अनेक वेळा आपल्या व्यापातून वेळ मिळत नाही. एखादा कार्यक्रम कार्य आपण करू शकत नाही.हेसुध्या आपल्या तरंगात महत्वाचे आहे. म्हणून शीकून व सरावाने अनेक कौशल्य विकसित करता येतात म्हणून अनेक कलाकार निर्माण होतात. असे अनेक कलाकार आहेत ज्यानी नाव कमावले, ते गायक, साहित्यिक, कवी, नट - नटी अनेक क्षेत्रात नाव कमावले. ते आपले क्षेत्र काबीज करून अमर झाले. अशा विशिष्ट माणसाच्या जीवनात वेळ क्षमा आशीर्वाद बोलणे अलग होते यावर सुखदुःखाचे परिणाम व तरंग अवलंबून आहे. म्हणून कुठेही शुभेच्छा व सकारात्मक कामासाठी वेळ काढावा. प्रयत्ने सर्व साध्य होते. टेक केअर, स्वस्थ राहा, मस्त राहा. सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा.



## आरोग्य संजीवनी

## मनुष्याला जन्म घ्यायला ९ महिने का लागतात?

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

शास्त्रानुसार आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून, मनुष्याच्या गर्भातील नऊ महिन्यांचा काळ हा केवळ शारीरिक विकास नसून ती एक महत्त्वाची आध्यात्मिक प्रक्रिया मानली जाते. 'गर्भ उपनिषद' या प्राचीन ग्रंथात गर्भातील नऊ महिन्यांच्या प्रवासाचे सविस्तर वर्णन केले आहे. शास्त्रानुसार, पहिल्या महिन्यापासून ते आठव्या महिन्यापर्यंत जीवात्मा आपल्या पूर्वकर्मांचे स्मरण करतो आणि ईश्वराशी अनुसंधान साधतो. नऊ महिने हा असा काळ आहे *ज्यामध्ये पंचमहाभूतांपासून (पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश) मानवी देह पूर्णपणे तयार होतो* आणि जीवात्म्याला या जगात येण्यासाठी आवश्यक असलेली शारीरिक आणि मानसिक परिपक्वता प्राप्त होते.

या कालावधीचे महत्त्व सांगताना शास्त्रे म्हणतात की, सातव्या-आठव्या महिन्यात जीवात्म्याला पूर्ण जाणीव प्राप्त होते आणि तो गर्भातील दुःखातून मुक्त होण्यासाठी ईश्वराची प्रार्थना करतो. नऊ महिने पूर्ण झाल्यावर तो देह मायेच्या प्रभावाखाली येण्यास आणि बाह्य जगात जगण्यास सज्ज होतो. नऊ ही संख्या शास्त्रात 'पूर्णत्व' दर्शवणारी मानली जाते. ज्याप्रमाणे निसर्गाचे चक्र एका विशिष्ट लयीत चालते, तसाच नऊ महिन्यांचा हा काळ जीवाच्या पूर्ण विकासासाठी आणि मागील जन्माच्या संस्कारांमधून मुक्त होऊन नवीन कर्म करण्यासाठी आवश्यक असलेला 'संधी काळ' मानला जातो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

नऊ महिने पूर्ण झाल्यानंतरच त्या देहात बाह्य सृष्टीतील 'प्राण' घेण्याची शक्ती निर्माण होते.

बाळ गर्भाशयात ९ महिने का राहते?

असे म्हटले जाते की प्रत्येक महिन्यात गर्भाशयात आत्मा त्याच्या आठवणींपासून मुक्त होतो. त्याच वेळी, शरीर भूक आणि भावनांकडे आकर्षित होते. नऊ हा अंक अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. परिपूर्णता या संख्येद्वारे परिभाषित केली जाते. भारतीय ब्रह्माण्डशास्त्र ९ चक्रांनी भरलेले आहे. ही नऊ चक्रे नियतीवर नियंत्रण ठेवतात. बाळ नऊ महिने गर्भाशयात राहते, त्यानंतरच त्याचा पूर्ण विकास होतो. शुक्रावर गर्भाशयापासून १ महिना अधिक परिणाम होतो. दुसऱ्या महिन्यात मंगळाचा प्रभाव जास्त असतो. तिसऱ्या महिन्यात गुरू ग्रहावर परिणाम होतो. चौथ्या महिन्यात सूर्य, पाचव्या महिन्यात चंद्र, सहाव्या महिन्यात शनी, सातव्या महिन्यात बुध, आठव्या महिन्यात चंद्र आणि नवव्या महिन्यात पुन्हा सूर्य प्रभावित होतो.

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### नियोजन

कुठलीही गोष्ट करण्यापूर्वी
नियोजन खरे करता
काम व्यवस्थित होते
आगोदर तयारी करुन
वेळेवर सर्व करताना
अडचण कधीना येते

पावसाच्या आगमनापूर्वी पहा
शेतकरी कामाला लागून
शेतीची कामे उरकतो
छान जलधारा बरसता
पेरणीच्या कामाला राजा
सुरुवात जोमाने करतो

# शेतकरी आत्महत्या; चिंतेचा विषय, हा एक संकेत?

**ज्योतिर्मय साहित्य**

अलिकडील काळात शेतकरी आत्महत्या, हा एक चिंतेचा विषय ठरलेला आहे. त्याचं कारण आहे नापिकी. ही नापिकी का होते? त्याचं कारण आहे पाणी. पाणी हे जमीनीतून उपलब्ध होतं आणि जमीनीत पाणी हे पावसानं उपलब्ध होतं. पाऊस...... पाऊस जेव्हा विपूल प्रमाणात येतो. ज्यातून ते पावसाचं पाणी जमीनीत मुरतं. तेव्हा जमिनीतील पाण्याची पातळी वाढते. कारण भुजल धारण करण्याची जमीनीची क्षमता वाढते. पाऊस..... अलिकडील काळात पाऊस जास्त पडतांना दिसत नाही आणि पडतो तर तोही जमीनीत मुरत नाही आणि जमीनीत पाऊस समजा मुरलाच तर जमीनीची पाणी धारण करण्याची क्षमता कमी झालेली आहे. त्याचं कारण आहे, वृक्षतोड. कारण वृक्ष हे जमिनीत मुरलेले पाणी हे शोषून घेतात व ते पाणी टिकवून ठेवतात, आपल्या मुळांद्वारे. कारण वृक्षांची मुळं ही दूरदूर गेलेली असतात, पाण्याच्या शोधार्थ. त्यातच त्याच वृक्षांच्या पाणी धारण करण्याच्या क्षमतेनं जमीनीत भुजल पातळी व पाणी दिसतं.

अलिकडील काळात जमीनीत भुजल पातळी उरलेली नाही. कारण वृक्षच अलिकडील काळात उरलेले नाहीत. हा परिणाम गावातही जाणवतोच. गावातही वृक्ष उरलेले नाही. सर्वत्र वृक्षांची तोड झालेली दिसत आहे. पुर्वी पाऊस जास्त पडायचा. हे सर्वांना माहीत आहे. सात सात दिवस पाऊस



संततधार असायचा. झडी लागलेल्या असायच्या. पाऊस कोणालाच आठ आठ दिवस बाहेर पडू द्यायचा नाही. झोपडे असायचे व त्या पावसाच्या

अंकुश शिंगाडे
नागपूर ९३७३३५९४५०

संततधार पडण्यानं झोपड्याला लावलेली कौलं पाझरायची. अंथरुण, पांघरुण ओलं व्हायचं. त्यातच बाहेरचं अंगणही चिपचिप होवून जायचं. कारण त्यात पावसाचं पाणी मुरायला जागा असायची. आता ती बाजू राहिलेली नाही. आता घरं सिमेंटची बनलेली असून आता त्या सिमेंटच्या घराखाली येणारं पावसाचं पाणी मुरत नाही. बाहेरचं अंगणही सिमेंटचं झालेलं असून तिथंही पाणी मुरत नाही. शिवाय रस्त्यावर जे पाणी मुरायचं. तेही सिमेंटचेच बनलेले आहेत. त्यातच गावात असे भाग उरलेले नाहीत की जिथं पावसाचं येणारं पाणी मुरेल.

पुर्वी गावात आपण प्रवेश करीत होतो. तेव्हा आपल्याला गावात प्रवेश करताच दिसायची ती झाडं. जी झाडं टुमदार असायची. आपल्या जन्माच्या कितीतरी पिढ्यांपासून आपल्या पौर्वजांनी जोपासलेली झाडं असायची. मुख्यतः गावात प्रवेश करताक्षणी चिंचेची वा कडूनिंबाची झाडं आपल्या स्वागतासाठी रांगेनं उभी असलेली दिसायची. हे प्रत्येक गावातील दृश्य असायचं. त्यातच गावाच्या बाहेर, स्मशानाला लागून आंब्यांची झाडं असायची. जेव्हा स्मशानात प्रेत जाळलं जायचं. तेव्हा सावलीसाठी हीच आमराई कामात यायची. त्यातच गावाच्या अंतर्भागाचा विचार केल्यास एक वडाचं डेरेदार झाड दिसायचं. ज्या झाडाखाली एक सभा व्हायची. ज्या झाडाखाली बसून एखाद्या निवाड्यावर निर्णय दिला जायचा. तसंच काही काही घराच्या समोर पिपळाचंही झाड दिसायचं.


गावात दिसणारं वडाचं झाड. कडूनिंबाचं, पिंपळाचं, चिंचेचं आणि आंब्याचं झाड. ही झाडं डेरेदार असायची व त्याच्या सावलीत बसलं की त्या झाडाच्या गार सावलीत अगदी उन्हाळ्यातही कासावीस झालेला जीव शांत व्हायचा. शिवाय प्रवासासाठी पुरेशी साधनं उपलब्ध नसल्यानं रस्त्यानं पायपीट करुन जातो म्हटल्यास प्रत्येक वळणावर रस्त्याच्या कडेला एक डेरेदार झाड आपल्या स्वागतासाठी उभं असलेलं दिसायचं. आज मात्र गावातील परिस्थिती वेगळीच आहे. गावात प्रवेश करताक्षणी चिंचेची झाडं दिसत नाहीत. गावातील अंतर्भागात सभा घेण्यासाठी लावलेलं वडाचं झाड दिसत नाही. प्रत्येक घरी लागलेलं वा लावलं जाणारं पिंपळाचं झाड दिसत नाही. स्मशानाच्या जवळपास असलेली आमराई दिसत नाही. त्यातच रस्त्यांच्या कडेवर सावलीसाठी उन्हाळ्याच्या दिवसात कासावीस झालेल्या जीवाला गार करणारं डेरेदार असलेलं कडुनिंबाचं झाड दिसत नाही. **(क्रमशः)**

# बिभत्सता की सौंदर्य

**ज्योतिर्मय साहित्य**



बिभत्सता आणि सौंदर्य यात खूप फरक आहे हे समाजाला बहुतेक कळत नाही, की कळून सुद्धा न कळल्याचे सोंग करतो आहे काय माहिती? पूर्वी साधेपणातील सौंदर्याला, सुंदरतेला ईश्वराची उपमा दिली जायची. सुंदरते बरोबर चेहऱ्यावरील निरागसता, नम्रता, सालसता व्यक्तिमत्त्वात विशेष भर घालायचे. स्त्रीचे सौंदर्य तिच्या नजाकतीत, तिच्या अदबीत दिसायचे. पुरुषाचे सौंदर्य त्याच्या कर्तुत्वात त्याच्या जबाबदारीत दिसायचे. पण हल्ली सोशल मीडिया स्क्रोल करताना उपयुक्त गोष्टींपेक्षा बिभत्सता भरभरून पाहायला मिळते.



अर्चना हिंग्लजकर, शिरवळ,
9225527464

आपल्या चिपऱ्या कपड्यात मुली, स्त्रिया बिभत्स हावभाव करत रिल्स बनवतात. सोशल मीडियावर अपलोड करतात आणि अशाच रिल्स वर वासनांध समाज लाईक्सचा पाऊस पाडतो. काही लोकप्रतिनिधींचे तर मला आश्चर्यच वाटते. कोणत्याही कार्यक्रम असू दे, बिभत्स नाचणाऱ्या मुलींना आणायचे आणि नाचवायचे. अशा कार्यक्रमाला प्रेक्षक कोण? तर किशोरवयीन तरुण मुले..... जी मुले भावी भारताचे भविष्य आहेत असे आपण म्हणतो ती मुले, निर्लज्जपणे ती बीभत्सता तोंडाला लाळ सुटेपर्यंत पाहत राहतात. हीच मुले पुढे जाऊन स्त्रीला केवळ शोभेची बाहुली, उपभोगाचे साधन मानू लागतात .वयाच्या आधीच त्यांना स्त्रियांच्या अंगाचे वेगळे महत्त्व जाणून दिले जाते .त्यांच्या डोळ्यात वासना टपकताना दिसते. हीच पिढी मग चिमुकली म्हणू नका, वृद्धा म्हणू नका कोणत्याही वयाच्या स्त्रीवर बलात्कार करायला धजावते. त्यावेळी आपण मोठमोठ्याने बोंबा मारतो..... समाज सुधारला पाहिजे...... कसा सुधरेल?.... बेजबाबदार लोकप्रतिनिधी.... पैसे कमवण्यासाठी कोणत्याही थराला जाणारे कलाकार... किड लागलेला विकृत समाज..... सांगा ना कसा सुधरेल. सध्या गाजत असलेला ३७० रुपयाची बिर्याणी हा विषय याच मानसिकतेची निशाणी आहे.

पूर्वी झाडामागून रोमांस करणारे नट नटी पाहिले की, प्रेमासारख्या पवित्र भावनेने प्रत्येकाच्या शरीरात रोमांच निर्माण व्हायचे. नटीच्या नजरेतून ती सालसता, ते लाजणे दिसायचे. अंगभर कपडे घातलेली स्त्री कुठेही अंगप्रदर्शन न करणारी स्त्री देखील अप्रतिम सुंदर दिसू शकते हे आपण विसरलेले आहोत. पूर्वी स्त्रीचा पदर जरा जरी ढळला तरी पुरुषांची नियत ढळायची. पण आज हजारो स्त्रिया, मुली नंगानाच करताना दिसतात. त्यामुळे सौंदर्य पाहण्याची ती नजर मेलीये .आता केवळ वासनेच्या नजरेतून स्त्री पाहिली जाते .पण वासना आणि जातीचे सौंदर्य यात जमीन आसमानाचा फरक आहे जातीचे सौंदर्य आदर द्यायला भाग पाडते. तर बीभत्सता वासनांध नजरांना खत पाणी घालते. सोशल मीडिया वापरणे किंवा रिल बनवणे वाईट नाही. पण काय दाखवायचे आणि काय झाकून ठेवायचे हे कळण्या इतपत सज्ञान आपण सगळे नक्कीच आहोत. याचा थोडा प्रत्येकाने विचार करायला हवा.अत्यंत नाजूक विषयावर लिहिण्याचे धाडस केलेले आहे काही शब्द चुकीचे गेले असल्यास मी दिलगिरी व्यक्त करते.

# गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया

गजवदना श्री लंबोदरा, सिद्धि विनायका भालचंद्रा, हेरंबा शिवपुत्रा, विघ्नेश्वरा अनाथ बंधू.


आज ज्येष्ठ शुक्ल चतुर्थी आहे. विनायकी चतुर्थी व संकष्ट चतुर्थी व्रत आपणा सर्वांना माहित आहे, पण व्रत पद्धत आणि उपास शक्य नसेल तर, गणेशाची सकाळी स्नान करून मनोभावे पूजा करावी.पूजा अर्चा झाल्यानंतर ओम सिद्धि विनायकाय नमः, ओम गं गणपते नमः या मंत्राचा किमान १०८ वेळा जप करावा. अथर्वशीर्ष या स्तोत्राची स्पष्ट उच्चारासह एकवीस किंवा सहस्त्र आवर्तने केली असता वाचासिद्धी येथे असा गणेश भक्तांचा अनुभव आहे.

चतुर्थी महात्म्य : वशिष्ठ महा मुनींनी दशरथ राजाला ज्येष्ठ शुक्ल चतुर्थीचे महत्त्व सांगताना म्हणाले की, राजा आंध्र प्रदेशातील शेषपुरात राहत असलेल्या कर्दम राजा बद्दल आज तुला मी सांगणार आहे. कर्दम राजा हा पराक्रमी शस्त्रात्र निपुण व धर्म परायण राजा होता. राज्यातील प्रजाजन सुखी आनंदाने सुरक्षित होते. सगळे काही आनंदात चालले असताना राजाला प्रमेय नावाचा रोग झाला. त्यांच्या अंगाचा सतत दाह होत असे. मलमूत्र विसर्जनाच्या वेळी ही त्यांना अग्नी सारखा दाह होऊ लागला. या दाहा मुळे काही वेळा त्या क्रिया बंद होत. या आजाराच्या यातना राजाला असह्य होऊ लागल्या. वैद्यांनी नाना प्रकारच्या औषधी दिली पण, योग काही बरा होईना.

आता राज्यात राहायला नको म्हणून राजा आपल्या धर्म पत्नीसह दूर एका वनात निघून गेला. त्या ठिकाणी सिंह, वाघ व अनेक हिंस्त्र प्राणी राहत होते. अशा वनातून जात असताना त्यांच्या सुदैवाने त्यांना भारद्वाज नावाचे ऋषी भेटले. ऋषीला पाहताच राजाने त्यांना साष्टांग दंडवत घातले व सतत होणाऱ्या दाहामुळे जमिनीवर पडूनच राजा आक्रोश करू लागला. राजाने आतापर्यंत काय घडले ते सर्व काही ऋषीला सांगितले. हे ऐकून भारद्वाज ऋषीचे अंतकरण हेलावले. राजाचे अशा अवस्था पाहून कृषी राजाला म्हणाले, राजन मी अंतर्ज्ञानाने तुझ्या दुःखाचे कारण काय आहे ते पाहतो. त्यांनी



काही वेळ ध्यान लावले तेव्हा त्यांच्याशी लक्षात आले की, शेषपुरात चतुर्थीचे व्रत नष्ट झालेले आहे, तसे आचरण कोणी करत नाही.



अध्यात्म...
नारायण पांडव
छ.संभाजीनगर 90499 27451

ऋषीने राजाला काय झाले आहे ते सांगितले. राजन तुझ्या राज्यात चतुर्थीचे व्रत कोणी न केल्यामुळे तुला हे दुःख भोगावे लागत आहे. त्यावेळी राजा म्हणाला, ऋषी यावर काही उपाय आहे का? तो तुम्ही सांगावा.

राजा तुला वरद चतुर्थीचे व्रत कसे करायचे ते सांगतो व व्रत केल्याने काय लाभ होतो हेही तुला सांगतो. व्रत केल्याने प्रत्यक्ष गणेशाची कृपा प्राप्त होते. ऋषी राजाला पुढे सांगतात ,माझ्यावर गणेशाची कृपा कशी झाली ते सांगतो. पूर्वी मी तपश्चर्या करीत असताना मला अंतर्ज्ञान प्राप्त झाले तसेच योग शांतीही प्राप्त झाली. पण नंतर मला काय झाले माहित नाही, पण मन अशांत झाले. त्यावेळी मला रैवत नावाचे महान योगी भेटले. त्यांनी सांगितले की गणेश हे ब्रह्मण पती आहेत. त्यांचीच तू भक्ती कर तुला शांती लाभ होईल. रेवताने मला विधिवत एकाक्षर मंत्र दिला मी रैवतांची पूजा केली. त्यांनी सांगितल्याप्रमाणे एकाक्षरी मंत्राचे दहा वर्ष अनुष्ठान केले. प्रत्यक्ष भगवान गणेश माझ्यासमोर प्रगट झाले त्यांना समोर बघून मी त्यांची अष्टनाम स्तोत्रानी स्तुती केली. गणेशाने प्रसन्न होऊन मला आशीर्वाद दिला. राजा मी तुला या व्रताची माहिती दिली आता गणेशाचा अष्टाक्षरी मंत्र देत आहे.''ओम गं गणपतये नमः'' राजन तू या व्रताचे प्रजाजनासह पालन कर. येत्या ज्येष्ठ शुक्ल चतुर्थीला तू हे व्रत कर असे सांगून भारत भारद्वाज ऋषींनी राजाला आशीर्वाद दिला व निघून गेले. जाताना आता तू राज्यात परत जा असे सांगितले.

ऋषीने सांगितल्यानुसार कर्दम राजा आपल्या राज्यात परत आला. राजा परत आलेला पाहून सर्वांना खूप आनंद झाला. ऋषींनी सांगितल्याप्रमाणे राजाने वरद चतुर्थीचे व्रत केले. त्या व्रताच्या प्रभावाने, आचरणाने प्रजा सुखी झाली. राजाचा आजार बरा झाला. कर्दम राजाने मुलाला गादीवर बसवले व राणीसह गणेशाची उपासना करण्यासाठी वनात निघून गेला. भक्त पालका करी करुणा, वरद मूर्ती तू गजानना, परशु हस्तासिंदूर वर्णा, विघ्ननाशक विश्वमुर्ती.

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....




तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



# गोपाळ गणेश आगरकर

## एक दुर्लक्षित समाज सुधारक

(आगरकर २४ जुलै-१८५६-१७ जुन१८९५)

✍मोहिनी किन्हीकर हेडावू मो. 98229 40912

कालच्या भागावरून पुढे.....

आगरकर फ्रेंच राज्यक्रांती मुळे फार प्रभावित झाले होते. त्यांनी रुसो, voltare चे लिखाण वाचून काढले.

आगरकरांनी मिल, स्पेन्सर यासारख्या पाश्चिमात्य विचारवंतांचे लिखाण वाचले होते. त्यांच्या मनावर त्यांच्या स्वातंत्र्याच्या विचारांचा पगडा होता. व्यक्तिस्वातंत्र्य हे त्यांनी मुल्य जीवापाड जपले होते. व्यक्तिस्वातंत्र्य म्हटले की स्त्री आणि पुरुष दोन्ही त्यासाठी त्यांनी आपल्या घरातून सुरुवात केली.. यालाच आपण करते सुधारक म्हणूया!

यासंबंधी एक प्रसंग सांगितला जातो . एकदा आगरकरांची विद्यार्थिनी त्यांना भेटायला त्यांच्या घरी आली .तेव्हा आगरकरांची पत्नी तुळशी वृंदावन समोर दिवा लावून रांगोळी काढत होती. त्या विद्यार्थ्यांनीने म्हटले की सर, तुम्ही कर्मकांड, अंधश्रद्धा मानीत नाहीत तर आपल्याला तर आपल्या पत्नीलाही करण्यापासून का परावृत्त करीत नाहीत?.. यावर त्यांचे उत्तर खूप मार्मिक आहे. ते म्हणाले, "मी व्यक्तिस्वातंत्र्य जपतो. म्हणुन माझ्या पत्नीला रांगोळी काढावीशी वाटते म्हणून ती रांगोळी काढते. म्हणून तिला रांगोळी काढण्यास मनाई करणे म्हणजे तिच्या विचार आणि व्यक्ति स्वातंत्र्यावर घाला आहे. हे मी कदापिही करणार नाही!"

यात सद्यपरिस्थितीत स्त्रीला हवी असलेली स्पेस आणि अवकाश हे त्यांनी आपल्या पत्नीला दीडशे वर्षापूर्वी दिली होती. हे कौतुकास्पदाच!

त्यानंतर दुसरे एक.. त्यांचे विचार खूप सुंदर विचारप्रवृत्त करणारे आहे ..ते म्हणजे समाजात हानिकारक असणाऱ्या रूढी-परंपरा या त्याज्यच आहेत. त्या कदापि पाळू नये.... कदापी पाळूच नये... परंतु ज्या प्रथा-परंपरा पाळण्याने समाजाचे काही नुकसान होत नाही, त्या परंपरा न पाळण्यात काय हशील? म्हणजे त्या परंपरा पाळल्याच पाहिजेत... म्हणजे त्यांचा नुसता विरोधाला विरोध नव्हता.

स्त्री पुरुष समानता, व्यक्तिस्वातंत्र्य अस्पृश्यता निवारण यासाठी कार्य केले तसेच अंधश्रद्धा, कर्मकांड,ग्रंथ प्रमण्या यावर कडकडून टीकाही केली.

टिळक प्रमाणेच त्यांची पण व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. त्यांनी शेक्सपिअरच्या हॅम्लेट या नाटकाचे विकार विलसित या नावाने रूपाने मराठीत रूपांतर केले. सुधकारतून, त्यांनी सुरू केलेल्या दैनिकातील लेखही लेखन शैलीचा उत्तम नमुना आहे. त्यात भावनोत्कटता, विनोद अलंकारिक भाषाशैली, देशाभिमान व तर्कशुद्ध विचार याचे दर्शन घडते. टिळक आणि आगरकर दोघांनीही डोंगरीच्या तुरुंगात जातील दिवस काढले होते त्या अनुभवावर आधारित आगरकरांनी" डोंगरीच्या तुरुंगातील 101 दिवस" हे पुस्तक आगरकरांनी लिहिले. क्रमश:..

# आत्मसाक्षात्कार व्हावा प्रकृतीचा खेळ कळावा...

**ज्योतिर्मय साहित्य**

दिनविशेष गुरुवार, १८ जून २०२६

वार : गुरुवार, मास : निज ज्येष्ठ, पक्ष : शुक्ल

तिथी : शुक्ल चतुर्थी, नक्षत्र : पुष्य (दिवसाच्या बहुतांश काळात), नंतर आश्लेषा प्रारंभ

चंद्रराशी : कर्क, योग : व्याघात (पंचांगानुसार वेळेत फरक असू शकतो)

पुष्य नक्षत्र हे सर्वश्रेष्ठ शुभ नक्षत्रांपैकी एक मानले जाते. देवगुरु बृहस्पतीचे अधिष्ठान असल्याने गुरु-उपासना, मंत्रदीक्षा, अध्ययन, दान, जप, पूजन यांसाठी अत्यंत मंगल. गुरुवार + पुष्य नक्षत्र यांचा योग विशेष पुण्यकारक मानला जातो.

दिवसाच्या उत्तरार्धात आश्लेषा नक्षत्र प्रारंभ होते. हे नक्षत्र अंतर्मुखता, गूढ चिंतन, उपासना व तांत्रिक साधनेस अनुकूल मानले जाते.

व्रत / उत्सव


विनायकी श्रीगणेश चतुर्थी : गणेशपूजन, संकटनाशन स्तोत्रपठण, गणपति अथर्वशीर्ष जप यांचे विशेष महत्त्व.

पुष्य नक्षत्र महिमा : नक्षत्राणामहं शशी। (भगवद्गीता) तसेच मुहूर्तशास्त्रात पुष्य नक्षत्राला ''सर्वकार्यसिद्धिदायक'' म्हटले आहे.

साधना-सूत्र

''गणेशस्मरणाने आरंभ, गुरुकृपेने सिद्धी.''

पुष्य नक्षत्राचा शुभ काळ आपण अनुभवत आहोत. उद्या गुरुवार, १८ जून २०२६ रोजी चंद्र या पुष्य नक्षत्रातून पुढे सरकून अश्लेषा नक्षत्रात प्रवेश करेल. या



अत्यंत महत्त्वाच्या नक्षत्र प्रवासाचे, तिथीचे आणि त्याचे विशेष महत्त्व : पुष्य ते अश्लेषा नक्षत्र प्रवास : सूर्योदयाच्या वेळी पुष्य नक्षत्र असेल, जे दुपारी सुमारे १२:५० पर्यंत चालेल. त्यानंतर नक्षत्रांच्या मालेतील नववे आणि अत्यंत रहस्यमय असे अश्लेषा नक्षत्र सुरू होईल. हे नक्षत्र पूर्णपणे कर्क राशीत येते.

१. दुपारपर्यंत: पुष्य नक्षत्र - नक्षत्रराज चा निरोप

उद्या दुपारपर्यंत पुष्य नक्षत्राचा शुभ प्रभाव कायम राहील. हे नक्षत्र पोषण आणि समृद्धी देणारे आहे.

२. दुपारनंतर: अश्लेषा नक्षत्र : दुपारी १२:५० नंतर सुरू होणाऱ्या अश्लेषा नक्षत्राचा स्वामी बुध आहे आणि याचे आराध्य दैवत नाग (सर्पदेव ) आहेत. याचे प्रतीक कुंडली मारून बसलेला साप आहे.


संस्कृत श्लोक:

अश्लेषायां नरो जातः क्रूरकर्मा च वंचकः।

तीक्ष्णबुद्धिः समर्थश्च सर्वशास्त्रविशारदः।।

तीक्ष्ण बुद्धिमत्ता आणि चातुर्य: अश्लेषा नक्षत्राला तीक्ष्ण किंवा दारुण संज्ञक मानले जाते. सर्पाप्रमाणेच या नक्षत्राची ऊर्जा अत्यंत चपळ, तीक्ष्ण आणि बचावात्मक असते. या दिवशी लोकांची बुद्धी खूप सावध आणि हुशार असते. कोणालाही सहज फसवणे आज शक्य होत नाही.

रहस्य आणि संमोहन: या नक्षत्रात एक वेगळेच आकर्षण आणि गूढ शक्ती असते. योगसाधनेत जी कुंडलिनी शक्ती मानली जाते, तिचे प्रतीक अश्लेषा नक्षत्र आहे. त्यामुळे अध्यात्माच्या दृष्टीने हे अतिशय शक्तिशाली नक्षत्र आहे.




गंडमूल नक्षत्र: ज्योतिषशास्त्रात अश्विनी, मघा आणि अश्लेषा ही नक्षत्रांच्या संधीवर येत असल्याने यांना गंडमूल नक्षत्रांमध्ये गणले जाते.

उद्याची तिथी विशेष: विनायकी गणेश चतुर्थी या पूर्ण दिवस ज्येष्ठ शुक्ल चतुर्थी तिथी असणार आहे. या तिथीचे स्वामी स्वतः भगवान गणेश आहेत.

संस्कृत श्लोक (चतुर्थी तिथी):

चतुर्थ्यां विघ्नराजस्य पूजा सर्वार्थसिद्धिदा।

संकटं हरते नित्यं सर्वकार्येषु पूजितः।।

गुरुवार आणि विनायकी चतुर्थीचा हा योग अत्यंत मंगलकारी आहे. हा दिवस विघ्नहर्त्या गणेशाच्या पूजेसाठी समर्पित आहे, जो आयुष्यातील सर्व संकटे आणि अडथळे दूर करतो.

काय करावे आणि काय टाळावे?

काय करावे?:

गणेश उपासना: उद्या विनायकी चतुर्थी असल्याने गणपती बाप्पाला दुर्वा आणि मोदक अर्पण करावेत. ॐ गं गणपतये नमः किंवा अथर्वशीर्षाचे पठण करावे.

अध्यात्म आणि ध्यान: दुपारनंतर अश्लेषा नक्षत्र सुरू होत असल्याने ध्यान धारणा करणे, योगासने करणे किंवा मंत्रसाधना करण्यासाठी अत्यंत अनुकूल काळ आहे.

काय टाळावे?:

अश्लेषा नक्षत्राच्या प्रभावामुळे दुपारनंतर लोकांमध्ये संशयी वृत्ती, गुप्तता राखण्याची प्रवृत्ती किंवा अचानक चिडचिड वाढू शकते. त्यामुळे उद्या कोणावरही विनाकारण संशय घेणे किंवा नात्यांमध्ये कटुता आणणे टाळावे.

अश्विनीपासून सुरू झालेला आपला नक्षत्रांचा हा पहिला टप्पा (पहिले नऊ नक्षत्रांचे चक्र) उद्या अश्लेषा नक्षत्रावर संपणार आहे. यानंतर चंद्र पुढच्या चक्रात म्हणजेच मघा नक्षत्रात प्रवेश करेल.


परवाच्या म्हणजेच शुक्रवार, १९ जूनच्या (मघा नक्षत्र - जे पितरांचे नक्षत्र मानले जाते) विवेचनासाठी आपण उद्या भेटूया!

# बहुरंगी लेखसंग्रह : हास्य घरात, शोधले गावात

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी साहित्यक्षेत्रात एक नामवंत लेखक म्हणून सर्वांना परिचित असलेले नागेश शेवाळकर यांनी आतापर्यंत कादंबरी, विनोदी कथासंग्रह, बालकथा, प्रवासवर्णन, चरित्रग्रंथ इत्यादी विविध साहित्य प्रकारांमध्ये लेखन केलेले आहे. नुकताच त्यांचा ''हास्य घरात, शोधले गावात'' हा लेखसंग्रह प्रसिद्ध झाला आहे. या लेखसंग्रहाच्या रूपाने त्यांनी आता नवीन साहित्यप्रकार हाताळलेला आहे.

''हास्य घरात, शोधले गावात'' या लेखसंग्रहामध्ये वेगवेगळ्या विषयांवरील एकूण चौदा लेख आहेत. यातील पहिलाच लेख, ''हास्य घरात, शोधले गावात'' हा पुस्तकाचे शीर्षक असलेला आहे. एका पैशाचाही खर्च नसलेला पण आपल्या देखणेपणात भर टाकणारा उपाय म्हणजे हास्य. याच हास्याचे महत्व विशद करणारा हा लेख आहे. निखळ हास्य मिळविण्यासाठी लेखकाने विविध मार्ग अवलंबिले परंतु निखळ हास्य सापडले नाही. अलीकडे टी व्ही वरील सिरीयलमध्ये सुद्धा निखळ हास्याऐवजी हास्यातील फोलपणा आणि विनोदातील बाष्कळपणा वाढलेला आहे. हास्यक्लबमध्ये सुद्धा बळजबरीने हसावे लागते. परंतु हवे असलेले तेच निर्मळ, निरागस आणि निखळ हास्य घरातच नातीच्या चेहऱ्यावर उमललेले पाहून लेखकाला समजून चुकले की,





जे मी बाहेर शोधत होतो ते तर घरातच आहे.

पुस्तकातील दुसरा लेख ''म्हातारा नव्हे महातारा''. या लेखामध्ये म्हातारपण आणि ज्येष्ठत्व यातील फरक विविध उदाहरणांनी दाखवून दिला आहे. स्वत:ला म्हातारा समजले तर मनुष्य विरक्तीकडे जातो. त्या ऐवजी वेगवेगळे छंद जोपासले तर मनुष्य मनाने तरुण राहतो.

''आनंदाचे डोही'' या लेखात आनंदाची महती सांगतांना दाही दिशा, नभ, वारा, सूर्यकिरण, झरे, वृक्षवल्ली इत्यादी अनेक ठिकाणी तसेच घराघरात आनंद पुरेपूर भरलेला असून तो आनंद उपभोगता आला पाहिजे, व्यक्त करता आला पाहिजे. निसर्गसुद्धा आपणास भरभरू आनंद देत असतो. याचप्रमाणे, आपण आनंदी असू तर सारे जग आनंदी भासेल. त्यामुळे छोट्या छोट्या गोष्टींनी दु:खी न होता, सकारात्मक वृत्तीने आपले मन इतरत्र वळविले तर आपणास आनंद नक्कीच मिळू शकतो. अशाप्रकारे आनंदी राहण्याची गुरुकिल्लीच या लेखात दिलेली आहे.

''अजिंक्यतारा : भालजी पेंढारकर'' या दीर्घ लेखामध्ये सहज आणि ओघवत्या भाषेत भालजी पेंढारकर यांचे जीवन चरित्रच लेखकाने रेखाटले आहे. ज्यावेळी भालजी पेंढारकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्राप्त झाला त्यावेळी ''समाजावर प्रत्यक्ष वा जलदरित्या परिणाम करणारं एक साधन म्हणून देव, देश, धर्म या त्रयींना उराशी कवटाळून, चित्रपटाद्वारे रसिकांपर्यंत पोहोचण्याचा मी प्रयत्न केला. त्याचंच यश म्हणजे मला लाभलेला हा दादासाहेब फाळके पुरस्कार असावा'' असे भावपूर्ण उद्गार भालजींनी काढले होते.




''गझलसम्राट सुरेश भट'' या लेखात सुरेश भट यांचा बालपणापासून तर गझलसम्राट होईपर्यंतचा प्रवास सुंदर शब्दांमध्ये वर्णिलेला आहे.

याचप्रमाणे, ''लवचिक झाली नाती'' या लेखात बदलत्या कालानुरूप नात्यांमध्ये होणारे सकारात्मक फेरबदल सांगितलेले आहेत तर ''बदलते महिला विश्व'' यातसुद्धा पूर्वीच्या काळातील महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन अलीकडे कसा बदलला तसेच महिलांचे शिक्षण आणि छोटे कुटुंब यातून नात्यांमध्ये कशी लवचिकता येत गेली याचे वर्णन केले आहे.

याशिवाय ग्रंथदिंडीचा वारकरी, जाऊ टीकेचिया द्वारी, चेहरा: भावनांचे दर्पण, आकाशवाणीचे हे... नैराश्य येता मनी, हे आणि इतर लेखसुद्धा खूप वाचनीय झालेले आहेत.

थोडक्यात, बहुरंगी असा हा लेखसंग्रह वाचकांना नक्कीच आवडेल यात शंका नाही.

श्री नागेश शेवाळकर यांना पुढील लेखनप्रवासासाठी मन:पूर्वक शुभेच्छा देतो आणि थांबतो.

-पुस्तक परिचय- ''हास्य घरात, शोधले गावात''
(लेखसंग्रह)
लेखक नागेश शेवाळकर
प्रकाशक- शॉपिजन, अहमदाबाद
पृष्ठे ८३, मूल्य २७५ रुपये

# ती (ललित लेखन)

**ज्योतिर्मय साहित्य**

मुक भावनांचा सागर
तिच्या आसवात वाहतो,
तळाशी ओसविणारा तो थेंब
आज तिच्या ओटीत का आटतो.
आज तिच्या ओटीत का आटतो.
सहज एक संदेश पाहिला नि शब्द शब्दातून...!

उंचच उंच वर अन् खोल अथांग निळाई नकळत मनाचा ठाव घेई. सुंदर अशा त्या एका रम्य सांजवेळी नभांगनातून ढगाआड लपलेला तो चंद्र अन् ढगांच्या विविध आकारातील राशी ,संथ नितळ वाहणाऱ्या पाण्यावर पडलेला तो मंद तांबूस प्रकाश वर उंचच उंच निळाई अन् खालून संथ वाहणारी निरा माई

आज एका कासाविसीने तिच्यात एक उत्कंठा जाणवत होती. आकाशतील ढगांच्या राशी ही तांबूस रंगाने वलयांकित झाल्या होत्या.अगदी रम्य सायंकाळ, पण का माहीत



नाही एक व्याकुळता त्यात जाणवत होती. जून पंधरावडा उलटून जुलै कडे धावत होता. पण

का कोण जाणे तिची ती व्याकुळ अवस्था काहीतरी खुणावत होती. निसर्गाला साद घालत होती जणू तिच्यात पडलेले माझेच प्रतिबिंब आणि दुसऱ्या काठांवर दिसणाऱ्या वृक्षराजींचे प्रतिबिंब आज नकळत छोटे छोटे होत चालले होते. तिचा तिचा प्रवास अव्याहतपणे सुरू होता. पण पांढरी फकट पडलेली वालुका आकाशाकडे डोळे लावून जणू याला जबाबदार कोण ?असे ठणकावून विचारत होती.

याला कुठेतरी आपण जबाबदार आहोत का! की निसर्ग पण निसर्ग जपणे आपल्या हातात आहे हो ना!

हळूहळू विसरणारा अंधार भविष्याला काही सुचवू पहात होता. वाळवंटातला ते कुरकुरणारा हापसा आणि त्यातून पडणारे ते घोट भर पाणी, चार चार मैलावरून पाणी आणणाऱ्या त्या स्त्रिया आणि लहान मुले पंधरा पंधरा फूट खोल जीवावर उदार होऊन उतरणारी मुल नजरेत येऊ लागली. न..न.. नको..




नको.. म्हणत गडद होणारा अंधार का कोण जाणे..! माहित नाही, पण मनाने मनाला आवाज दिला.की आपणच आपल्यापासून सुरुवात करायला हवी आहे. काळजी करण्यापेक्षा कधीही आधी काळजी घेतलेली बरी. प्रसार माध्यमांद्वारे समोर आलेले एक चित्रातून झालेला हा लेखन प्रपंच

तळाशी ओसविणारा थेंब
काळजाचा त्या ठाव घेई,
फांदीवर पहुडलेला पक्षी
जीवनाचे नवे गीत गाई
संथ वाहते निरा माई

कल्पनेत रमलेले मन नकळत थकून सायंकाळी घरी परतलेल्या झाडावर पानाआड विसावलेल्या त्या पक्षाच्या आठवणीत हरवले. उद्या त्याला पुन्हा नव्या दिवसाच्या नव्या मार्गावर मार्गस्थ व्हायचे होते. **(क्रमश:)**




# काय आहे हा अल निनो?

**ज्योतिर्मय साहित्य**

सध्या आपण पावसाची आतुरतेने वाट पाहत आहोत. बऱ्याच ठिकाणी पाण्याची कमतरता जाणवत आहे. धरणांची पाण्याची पातळी कमी होत चालली आहे. आपण कधी बातम्या ऐकल्या तर बातम्यामध्ये अल निनोमुळे पाऊस लांबला असे कधी कधी ऐकायला मिळते आहे.

मग सर्व सामान्य व्यक्तीला प्रश्न पडतो काय आहे हे अल निनो? म्हणून आज आपण अल निनो बद्दल थोडंसं जाणून घेऊ यात. अल निनो ही प्रशांत महासागरातील समुद्राच्या पाण्याचे तापमान असामान्यपणे वाढण्याची नैसर्गिक घटना आहे. स्पॅनिश भाषेत अल निनो म्हणजे लहान बाळ किंवा ख्रिस्त बालक.

पेरूच्या मच्छिमारांनी अश्या काळात समुद्र गरम होतो म्हणून हे नाव दिले आहे. साधारणतः पॅसिफिक महासागरावर पूर्वेकडून पश्चिमेकडे वारे वाहतात. ते गरम पाणी आशियाकडे ढकलतात, त्यामुळे भारतात चांगला मान्सून येतो. अल निनोच्या वेळी हे वारे कमकुवत होतात किंवा उलटे वाहतात. परिणामी मध्य व पूर्व पॅसिफिकचे पाणी २ किंवा त्यापेक्षा थोडे जास्त गरम होते. ही उष्णता वातावरणात पसरते आणि जागतिक हवामान बिघडवते. सहसा दर २ ते ७ वर्षांनी अल निनो येतो आणि साधारणपणे १वर्ष त्याचा प्रभाव राहू शकतो. भारतात यामुळे मान्सून कमकुवत होतो.




अल निनो वर्षात भारतात पाऊस सामान्यपेक्षा कमी पडतो, दुष्काळाची शक्यता वाढते. तापमान साधारणपणे २ ने वाढते. उत्तर, मध्य, पूर्व भारतात तीव्र व दीर्घ उष्णतेच्या लाटा. अर्थातच शेतीवरही या साऱ्या गोष्टीचा परिणाम होत असतो. यामुळे धान्य, डाळींचे उत्पादने, मका आदींचे उत्पन्न घटते. पाणी टंचाई होऊ शकते आणि या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन महागाई ही वाढू शकते.

मध्य दक्षिण व पश्चिम भारतासारख्या आधीच जास्त पावसाच्या भागात पाऊस कमी दिवस पडतो, पण पडला तर खूप जोरात पडतो, पूर ही येऊ शकतो. २०२६ मध्ये सुपर अल निनो येण्याची ८०-९०% शक्यता आहे, असे अंदाज वर्तविल्या गेले आहेत.

सुपर अल निनो हा सामान्य अल निनोपेक्षा खूप शक्तिशाली असतो. तापमान २ पेक्षा जास्त वाढते. साधारणतः १५० वर्षापूर्वी १८७७-७८ मध्ये अशाच सुपर अल निनोमुळे भारतात महादुष्काळ पडला होता, बऱ्याच जणांचा बळी गेला होता असे वाचण्यात ही आले होतें. असाच प्रकार या वर्षी भारतात सध्या तरी दिसतो आहे. पण वातावरण सारखे बदलते आहे, त्यामुळे १०० टक्के अंदाज लावणे चुकीचे ठरू शकते. म्हणून जुन्या काळासारखा दुष्काळ या वर्षी पडू नये हीच प्रार्थना त्या विधात्याला करू यात. आणि पाण्याचा थेंब थेंब वाचवू यात.

# संस्कृती कला अकादमी चित्रकारांसाठी हक्काचे व्यासपीठ


**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

राजकारण, चालू घडामोडी यावर माहिती देत तीक्ष्ण आणि कल्पक शैलीने अलोक सर या चित्रकलेच्या कार्यशाळेत शिक्षण देत असल्याने त्यांच्या कल्पक शैलीचे शिक्षण कार्यशाळेमध्ये सहभागी होत शिकण्याची प्रेरणा घेत मनस्विनी लाटकर दर रविवारी पुण्यामध्ये याचा लाभ घेत आहे.एक वर्षाच्या कार्टूनिंग कार्यशाळेमध्ये आवड असलेल्या या कार्यक्षेत्रात मनस्विनी तिचे करीअर नक्कीच विकसित करेल. मनस्विनी चित्रामधील कार्टूनिंग अगदी मूलभूत पातळी पासून शिकत आहे.कार्टूनच्या माध्यमातून भाव-भावना व्यक्त करणे. त्याचबरोबर एक संपूर्ण एखादा ज्वलंत विषय घेऊन संपूर्ण कॉमिक पुस्तक कसे तयार करावयाचे हे सर्व पध्दतशीरपणे ती शिकत आहे. मला विशेष आनंद यासाठी वाटला कि, आज साताऱ्याहून पुण्याला ये-जा करण्याची एसटीमुळे सर्वसामान्यांनाही शिक्षणासाठी एसटी पास घेऊन सोय निर्माण झाली आहे. देश-परदेशातून शिक्षण घेण्यासाठी पुणे येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कोर्स-अभ्यासक्रमाव्दारे त्यांच्या अंगभुत असणाऱ्या कलागुणांना वाव मिळत आहे. आपण नशीबवान आहोत कि, पुणे हे शिक्षणासाठी देशात-परदेशात प्रसिद्ध असलेले शहर आपल्या साताऱ्यापासून फक्त १०० कि.मी. अंतरावर आहे. विद्यार्थी त्याच्याकडे असणारे कलागुण साताऱ्यात राहून पुण्याला ये-जा करीत स्वतःला आत्मविश्वासपूर्वक विकसित करू शकतात आणि करीत आहेत. मनस्विनी लाटकर येत्या काही वर्षात प्रसिद्ध कार्टूनिस्ट चित्रकार म्हणून आपल्याला नक्कीच पहावयास मिळेल. तिची जिद्द, अभ्यासु वृत्ती आणि असलेली समज व आवाका तिला नक्कीच यश मिळवून देईल.

जो साको या जगप्रसिद्ध चित्रकार यांनी कॉमिक्स, ग्राफिक नॉव्हेल आणि पत्रकारितेचा संगम करून युद्ध, विस्थापन, दडपशाही आणि मानवी वेदना यांना चित्रांच्या माध्यमातून मांडण्याची स्वतंत्र शैली निर्माण केली. त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य असे की ते केवळ कथा सांगत नाहीत, तर प्रत्यक्ष स्थळांवर जाऊन, मुलाखती घेऊन आणि निरीक्षणांच्या आधारे कॉमिक जर्नालिझम उभे करतात. जो साको हे मुळचे माल्टामध्ये जन्मलेले, अमेरिकेत स्थायिक झालेले कार्टूनिस्ट आणि पत्रकार आहेत. त्यांनी सुरुवातीपासूनच युद्ध, राजकारण आणि सामान्य माणसांच्या अनुभवांना केंद्रस्थानी ठेवून काम केले, त्यामुळे त्यांची पुस्तके केवळ मनोरंजन न राहता दस्तऐवजीक स्वरूप धारण करतात.त्यांच्या लेखन-चित्रणाची पद्धत पारंपरिक कॉमिक्सपेक्षा वेगळी आहे. ते घटनास्थळी जाऊन दीर्घकाळ संशोधन करतात, स्थानिक लोकांशी संवाद साधतात आणि त्या अनुभवांना दृश्य कथनात रूपांतरित करतात. त्यामुळे त्यांच्या पुस्तकांना पत्रकारिता, इतिहास आणि साहित्य यांचा संगम म्हणता येतो

त्यांचे सर्वात गाजलेले पुस्तक पॅलेस्टाईन हे वेस्ट बँक आणि गाझा पट्टीतील अनुभवांवर आधारित नॉन-फिक्शन ग्राफिक नॉव्हेल आहे. हे काम १९९० च्या दशकाच्या सुरुवातीस केलेल्या प्रवास, निरीक्षण आणि १०० हून अधिक



मुलाखतींवर आधारित असल्याचे स्रोतांमधून स्पष्ट होते.या पुस्तकाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी दाद मिळाली. त्याला अमेरिकन बुक अवॉर्ड मिळाला आणि पुढे ते ग्राफिक नॉन-फिक्शनच्या इतिहासातील एक मैलाचा दगड मानले जाऊ लागले. २०२४ मध्ये गाझामधील युद्धामुळे या पुस्तकाची नव्याने चर्चा झाली आणि मागणी वाढल्याने पुनर्मुद्रणही करावे लागले

साको यांचे काम केवळ पॅलेस्टाईनपुरते मर्यादित नाही. त्यांनी बोस्नियातील युद्धावरही महत्त्वाचे ग्राफिक रिपोर्टिंग केले, ज्यामध्ये सेफ एरिया गोर्झाडे हे पुस्तक विशेष उल्लेखनीय आहे. या पुस्तकाला २००१ चा ऐसनेर अवॉर्ड मिळाला आणि ते युद्धातील मानवी जीवनाचे अत्यंत प्रभावी चित्रण मानले जाते.

बोस्नियातील कामासाठी त्यांनी पाच महिने संशोधन केले आणि सुरक्षित क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या गोराजडे मध्ये प्रत्यक्ष राहून अनुभव घेतला. हे पुस्तक युद्धकाळातील दैनंदिन जीवन, भीती, अभाव आणि राजकीय अपयश यांचे सजीव चित्रण करते.

साको यांचे महत्त्व इतकेच नाही की त्यांनी संघर्षांवर लिहिले; त्यांनी त्या संघर्षांना मांडण्याची नवी भाषा शोधली. त्यांच्या आधी अनेक पत्रकार युद्धवृत्तांत लिहीत होते, पण चित्रकलेच्या साहाय्याने इतक्या खोलवर, इतक्या संवेदनशील पद्धतीने राजकीय वास्तव दाखवणारे काम कमी होते.त्यांचे चित्रण काळ्या-पांढऱ्या रेखाटनात असते, पण त्या साधेपणात प्रचंड ताकद असते. चेहऱ्यांवरील भाव, उद्ध्वस्त परिसर, गर्दी, शांतता आणि तणाव हे सगळे त्यांच्या फ्रेम्समधून ठळकपणे समोर येते. त्यामुळे वाचक केवळ माहिती घेत नाही, तर तो अनुभव जवळून जगतो

त्यांच्या यशामागे तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत: विषयांची गंभीरता, संशोधनाची खोली आणि दृश्य कथनाची ताकद. त्यांनी निवडलेले विषय असे आहेत की जे राजकीयदृष्ट्या गुंतागुंतीचे असूनही सामान्य वाचकांपर्यंत पोहोचतात. त्यांची पुस्तके वाचताना इतिहास, राजकारण आणि मानवी भावविश्व एकाच वेळी उलगडते. दुसरे म्हणजे, त्यांनी स्वतःला केवळ कलाकार न ठेवता एक निरीक्षक, वार्ताहर आणि साक्षीदार म्हणून सादर केले. त्यामुळे त्यांच्या कामाला नैतिक वजन लाभले. वाचकांना हे जाणवते की हे चित्रण केवळ कल्पनाशक्तीतून नव्हे, तर प्रत्यक्ष भेटलेल्या लोकांच्या कहाण्यांतून उभे राहिले आहे.तिसरे म्हणजे, त्यांनी कॉमिक्सला ''दुसऱ्या दर्जाचे'' माध्यम न राहू देता ते गंभीर इतिहासकथनाचे साधन बनवले. या माध्यमातून त्यांनी युद्ध, विस्थापन, वसाहतवाद, वांशिक हिंसा




आणि राजकीय असमतोल यांसारखे विषय तितक्याच गांभीर्याने मांडले, जितके एखादे मोठे पत्रकारितेचे पुस्तक किंवा इतिहासग्रंथ मांडते.

साको यांच्या कामाला विविध पुरस्कार, समीक्षणे आणि शैक्षणिक मान्यता मिळाली आहे. पॅलेस्टिन ला अमेरिकन बुक अवॉर्ड मिळाला, तर सेफ एरिया गोराजडे ला ऐसनेर अवॉर्ड मिळाला.

त्यांची पुस्तके विद्यापीठांतील संशोधनासाठीही वापरली जातात, यावरून त्यांच्या कार्याचा शैक्षणिक दर्जा स्पष्ट होतो.त्यांच्या कामाची तुलना अनेकदा पत्रकारिता आणि साहित्याच्या सर्वोच्च परंपरांशी केली जाते. काही समीक्षकांनी त्यांच्या ग्राफिक नॉव्हेल्सना युद्धपत्रकारितेचा नवा प्रकार मानले आहे. त्यामुळे ते केवळ कॉमिक लेखक नसून आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाचे दस्तऐवजी लेखक म्हणून ओळखले जातात.

जो साको यांचे योगदान केवळ एका कलाकाराचे यश म्हणून मर्यादित नाही. त्यांनी चित्रमाध्यमाला सामाजिक स्मृतीचे साधन बनवले आणि विस्मरणाच्या विरुद्ध उभे राहिले. पॅलेस्टाईन, बोस्निया आणि इतर संघर्षांवरील त्यांच्या कामामुळे सामान्य वाचकांना गुंतागुंतीच्या आंतरराष्ट्रीय संघर्षांचे मानवी रूप समजते. त्यांच्या पुस्तकांनी हे सिद्ध केले की कॉमिक्स हे केवळ बालसुलभ मनोरंजन नाही, तर गंभीर सत्यकथनाचे सक्षम माध्यम आहे. म्हणूनच ''चित्रांच्या सहाय्याने पुस्तके प्रकाशित करून मिळविलेले यश'' हे त्यांच्या बाबतीत केवळ व्यावसायिक यश नसून सांस्कृतिक क्रांतीचा भाग आहे.

जो साको यांनी संघर्षग्रस्त जगाचे चेहरे, आवाज आणि जखमा चित्रांमध्ये जतन केल्या; त्यामुळे त्यांचे लेखन आजही समकालीन इतिहास समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते.

साताऱ्याची मनस्विनी लाटकर पुढील काळात जो साको या चित्रकारासारखे यश मिळवेल अशा तिला शुभेच्छा.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559